

# अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा भोकणीत अभ्यास दौरा

## गावच्या सामाजिक कामात सहभागी होण्याची केली इच्छा

**भोकणी : वार्ताहर**

तालुक्यातील भोकणी येथे नाशिक येथिल के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या ७० विद्यार्थ्यांच्या गटाने अभ्यास दौऱ्या अंतर्गत भेट देऊन, ग्रामपंचायतने राबवलेल्या विविध पर्यावरण पुरक उपक्रमाची पाहणी केली.

माझी वसुंधरा ४.० अभियानांतर्गत गावात पर्यावरण दृष्ट्या होणारा बदल पाहुन या विद्यार्थ्यांनी गावाच्या सामाजिक कामकाजात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली.

भोकणी ग्रामपंचायतला ५० लाख रुपयांचे तिसऱ्या क्रमांकाचे राज्यस्तरीय बक्षीस नुकतेच जाहीर झाले आहे. निसर्ग वन, तुलसी वन, नक्षत्र बाग, ऑक्सिजन झोन, अमराई, रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड केलेल्या व हिरवाईने नटलेल्या परिसराचा आंनद घेतला. सरपंच अरुण वाघ, ग्रामसेवक योगेश राहाणे, ग्रामपंचायत सदस्य शरद साबळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. उर्जा ग्रिडच्या प्रात्यक्षिक अभ्यास दौऱ्याचे औचित्य साधुन विद्यार्थ्यांनी भोकणी गावातील सोलर युनिट, सैनिक सन्मान बाग, नैसर्गिक धबधबा, कमळ बाग, जिवामृत बेड प्रकल्प, वॉटर एटीएम मशीन, प्लास्टिक क्रश मशीन, केशर आंबा बाग, पक्षी उद्यान व उद्यानातील प्राणी, पक्षी प्रतिकृती, नक्षत्र वन, मसाले वन, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प, आदी ठिकाणी भेट देऊन माहिती घेतली. पर्यावरण दृष्ट्या मानवी आरोग्यास अत्यंत अनुकुल असलेल्या भोकणी गावात राष्ट्रीय सेवा योजनेचा १० दिवसाचा कॅम्प आयोजित करण्याची इच्छा के. के. महाविद्यालयाचे प्राध्यापक निखिल गायकवाड व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

> भोकणी गावाला पर्यटक, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, एम. आय. डी. सी. तील कंपनी कामगार, व्यवस्थापन कर्मचारी, शासकीय कर्मचारी यांची रेलचेल सुरू झाली आहे. बक्षिसाच्या रकमेतून नदी, नाले, तळे, सौर ऊर्जेवर चालणारे दिवे, विजेवरील वाहनासाठी चार्जिंग पॉईंट उभारणी व माझी वसुंधरा अभियान ५.० वरती काम करणार असून, अधिकाधिक योजना राबवून गाव समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणार.
>
> **योगेश रहाणे, ग्रामसेवक**

Gavkari 16-10-2024